# जिल्हा व सत्र न्यायालय, बीड

(लेखा व वित्त विभाग)

**जाहीर–निवीदा**

जावक क्रमांक :११९/2025

दिनांक :– २७/01/2025

मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बीड यांचे आदेशावरुन सर्व संबंधितांना या जाहीर निवीदेद्वारे कळविण्यांत येते की, जिल्हा व सत्र न्यायालय, बीड येथील कार्यालयीन कामकाजासाठी झेरॉक्स पेपर ए–4 खरेदी करणे आहे. त्याकामी खालील दर्शविल्याप्रमाणे जे.के. कंपनीचे झेरॉक्स पेपर ए–4 रिम आकार 70 जी.एस.एमचे दर सर्व करासहीत (**Including GST**) नमुद करुन आपली निविदा या कार्यालयास पाठविण्यांत यावी.

| अ.क्र. | तपशील | आकार व जाडी | नग | दर (सर्व करासहित) |
|---|---|---|---|---|
| 1. | झेरॉक्स पेपर JK EASY COPIER | ए–4 70 GSM | 1000 रिम | |

आपण आपली निवीदाचे दर सर्व करासहीत नमुद करुन निवीदा सिलबंद पाकीटात या न्यायालयात दिनांक 11/02/2025 रोजी 05.00 वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत दाखल कराव्यात तसेच निवीदा ही **प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय,बीड यांचे नावाने पाठवावी व बंद पाकीटावर "झेरॉक्स पेपर निवीदा" असे लिहावे.** तसेच उशीरा प्राप्त झालेल्या निवीदांचा विचार करण्यात येणार नाही. विहित मुदतीत प्राप्त निवीदा शक्य झाल्यास दिनांक 12/02/2025 रोजी सकाळी 01:00 वाजता मा. जिल्हा न्यायाधीश–1,बीड यांचे निजीकक्षात खरेदी–समिती समक्ष उघडण्यात येतील. सर्वात कमी दराची (GST) सहित निविदा स्किारण्यात येईल. **वस्तु कार्यालयात पोहचविण्याचा खर्च (Delivery Charge) अनुज्ञेय होणार नाही. तसेच सदरील वस्तु स्वखर्चाने पाहोच करणे आवश्यक राहिल.** निवीदा स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा संपुर्ण अधिकार बीड जिल्हा खरेदी समिती यांना राहील.

आदेशावरुन,

27/1/2025

प्रबंधक

जिल्हा न्यायालय, बीड

**<u>नियम व अटी</u> :–**

1. निविदाकारांनी निविदा / दरपत्रक सादर करतांना त्यावर जी.एस.टी. / एस.जी.एस.टी. क्रमांक नमुद करणे आवश्यक आहे. जर नसेल तर तत्सम प्राधिकरणाकडील नोंदणी क्रमांक नमुद असलेले निवीदाकाराच्या लेटर हेडवरील दरपत्रक वैध असतील.
2 निविदाकारांनी निविदा / दरपत्रकात पॅनकार्डची छायांकित प्रत जोडणे बंधनकारक असेल.
3 प्रत्येक निविदाकारास फ़कत एक निविदा / दरपत्रक सादर करण्याची परवानगी असेल.
4 खरेदी प्राधिका–यांबरोबर हितसंबंध नसल्याबाबत आणि ईच्छुक संस्थेने एकल निविदा देण्याबाबत निविदाकारांना "हमीपत्र" सादर करावे लागेल.
5 झेरॉक्स पेपरचे दर हे सर्व करासहीत नमुद करणे आवश्यक आहे.
6 निविदा ही सिलबंद पाकीटात (Speed Post) व्दारे किंवा आवक विभाग जिल्हा न्यायालय,बीड येथे हातोहात द्यावी.
7 ऑर्डर मिळाल्यानंतर कागदाचा तात्काळ पुरवठा करणे आवश्यक आहे.
8 ऑर्डर दिल्यानंतर 15 दिवसांत देयकाची रक्कम अदा करण्यात येईल.

**<u>याची एक प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव सादर</u> :–**

संगणक विभाग प्रमुख, संगणक विभाग, जिल्हा न्यायालय,बीड
– यांना सुचित करण्यात येते की, सदरील निवीदा जिल्हा व सत्र न्यायालयाच्या वेबसाईडवर अपलोड करावी.

आदेशावरुन,

प्रबंधक 27/1/2023

जिल्हा न्यायालय, बीड